Vol 5 Issue 9 Oct 2015
ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary
Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## International Advisory Board

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## Editorial Board

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.org**

Indian Streams Research Journal
ISSN 2230-7850

Impact Factor : 3.1560(UIF)
Volume - 5 | Issue - 9 | Oct - 2015

# तुकोबाच्या 'पाईकाच्या अभंगातून' राष्ट्रजागृती

राजेश मिरगे
सहा. प्राध्यापक, मराठी विभाग , श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती.



**सारांश**

महाराष्ट्राच्या वारकरी संप्रदायात संतांनी समाजाला सर्वस्पर्शी व्यापक अशा स्वरुपाची चिरंतन मूल्ये दिली. ज्ञानदेव ते तुकाराम आणि त्यांच्या प्रभावळीतील सर्व संत मंडळी यांचा यात प्रामुख्याने समावेश आहे. ज्ञानयोग, भक्तियोग या तीन चिरंतन मूल्यांना समाजासमोर तर त्यांनी ठेवलेच पण त्याचबरोबर वैयक्तिक आचरणातून त्यांनी समाजासमोर आदर्शाचा परिपाठ जनसंवादातून मांडला त्यात प्रामुख्याने जगद्गुरु तुकारामांनी अभंगवाणीतून समाजाची सर्व क्षेत्रे ढवळून काढून क्रांतीच्या दिशेने, सामाजिक समरसतेकडे त्यांच्या विचारांची वाटचाल स्पष्ट होते. तुकारामाची अभंगवाणी समाजातील प्रत्येक क्षेत्रावर वृत्तीप्रवृतीवर भाष्य करते. त्या भाष्यातून सामाजिक परिवर्तनाची वाट निर्माण व्हावी हाच प्रामुख्याने तुकोबांचा उदेश होता.



**प्रस्तावना**

तुकोबांच्या अभंगवाणीचा 'आत्मा' अनुभव हाच आहे त्याशिवाय ती बोलतच नाही. अनुभवाशिवाय बोलणे, लिहिणे म्हणजे पाप होय ही भावना मुळातच तुकोबांची आहे. तुकोबा हे संसारी पुरूष, त्यांच्या घरी शेती, महाजनकीचा व्यवसाय परंपरेने आलेला असल्याने त्यांचा 'शेती–पर्यावरण' याबद्दलचा अनुभव दांडगा होता. साहजिकच तुकोबांनी कृषीसंस्कृती संवर्धन आणि विकासासंबंधी मोलाचा उपदेश, विचार साडेचार हजार अभंगसंख्या असलेल्या अभंगवाणीत आविष्कृत झालेला आहे. शेती आणि संबंधीचे समस्याचे विवेचन तुकोबांनी तर केलेच आहे पण त्याच बरोबर रूपकात्मक रीतीने मांडून मानवी स्वभावाचे आणि त्यांच्या वैगुण्यावर त्यांनी बोट ठेवले आहे. त्यामुळे तुकोबांनी अभंगवाणीतून आविष्कृत केलेला कृषीसंस्कृतीचा आणि पर्यावरणाच्या संतुलनाचा विचार आज समाजावर परिणाम करून जातो. तुकोबांच्या अभंगवाणीचे मूल्यमापन मात्र या अंगाने होऊन समाजाच्या सर्वस्तरापर्यंत पोहचविणे ही आज काळाची गरज आहे. आज पारंपरिक शेतीचा .हास होत चालला आहे. शेतीच्या संबंधी विकासासाठी ज्या कौशल्याचा अंतर्भाव असावा तो नाही तसेच रासायनिक शेती आणि त्यांचे दुष्परिणाम आणि शेतीचे भकासलेपण वाढत चालले आहे. सोबत निसर्गाचा लहरीपणा आणि पर्यावरणीय असंतुलन हे प्रश्न आज तोंड वर करून आवाहन देत आहेत. एकूण आज कृषिप्रधान संस्कृती असणा.या भारताची शेती आणि शेतक.यांचे जीवन विनाशाकडे जात आहे की काय? असा प्रश्न पडला आहे. शेतीच्या प्रगतीचा मार्ग विस्तारीत कशाने होईल? त्यासाठी कोणकोणत्या दक्षता आणि उपाययोजना असल्या पाहिजेत याचा एक शास्त्रशुध्द आलेख तुकोबांनी आपल्या अभंगवाणीतून आविष्कृत केला आहे. शेतीची मशागत, पेरणी, त्याचे पोषण, पिकाची निगा, शेतीपूरक व्यवसाय या आवश्यक असणा.या बाबीचे विवेचन तुकोबांनी अभंगवाणीतून केले आहे ते म्हणतात

बीज पेरी शेती । मग गाडेवरी वाहाती ।।१।। धृ ।।
वाया गेले ऐसे दिसे । लाभ त्याचे अंग वसे ।।छ ।।
पाल्याची जतन । तरि प्रांती येती ।।२।।
तुका म्हणे आळा । उदक देता लाभे फळा ।।३।।
२०८६ तु.शा.गा.

तुकोबांनी या अभंगातून शेती जर संपन्न आणि समृध्द करायची असेल तर परिश्रमाला पर्याय नाही, कष्टाची जोड ज्यांची असेल त्याचीच शेती आहे असे जे म्हटल्या जाते ते खऱ्या अर्थाने यथार्थ आहे. मूठभर बी शेतात 'जर पेरले तर गाडभर धान्य' शेतकऱ्यांना मिळते पण श्रम करणे आवश्यक आहे. श्रमाशिवाय मात्र शक्य नाही. शेतीत उत्पन्न घेण्यासाठी शेतकऱ्यांना अहोरात्र

परिश्रम घ्यावे लागतात. पेरणीनंतर रोपांची निगा त्याला ठेवावी लागते. अंकुर फुटल्यापासून तर त्याचे पूर्णपणे पीक तयार होईपर्यंत त्याला निगा राखावी लागते तरच त्यांच्या घरचे धान्याचे कोठार भरू शकते. तुकोबाच्या शेतीसाठीचा श्रमसंस्कार शेतकऱ्यांमध्ये रूजविणे गरजेचे आहे. तुकोबाचा शेतीसाठीचा श्रमसंस्कार शेतकऱ्यांमध्ये रूजविणे गरजेचे आहे. कारण आज देशात शेतकऱ्यांच्या दुरावस्थेचे कारणांपैकी एक कारण म्हणजे अलीकडच्या काळात शहरीकरणामुळे शेतकऱ्यांचे खेडयातून शहरात झालेले स्थलांतर. या स्थलांतरामुळे शेतकरी शेती शहरातून पाहू लागला. त्याचे लक्ष फक्त शेतीच्या उत्पन्नाकडे मात्र त्यासाठी मशागतीसाठी मात्र गडीमाणसांवर विश्वास टाकून स्वतः मात्र अलिप्त राहण्याची त्यांची वृत्ती यामुळे शेतकरी नागविण्याचे हे एक कारण आहे. महाराष्ट्रात विशेषतः पश्चिम महाराष्ट्र सोडला तर इतर विदर्भ आणि मराठवाडयात शेती ऱ्हास पावत चालली आहे. त्यासाठी सरकारीस्तरावर अनेक योजना राबविल्या जात आहेत. पण त्या प्रामाणिकपणे आणि परिश्रमपूर्वक न राबविण्याने त्यांचाही बोजवारा वाजला आहे हे वास्तव आहे. तुकोबांची अभंगवाणी मात्र शेतीच्या विकसनासाठी प्रामाणिक परिश्रमाची आवश्यकतेवर भर देते. शेतकऱ्याने जर रक्ताचे सिंचन करून अहोरात्र काबाडकष्ट करून शेतीकडे लक्ष दिले तर त्याच्या घरात समृध्दता नांदेल. झाडाला आळे करून सिंचन केले तर फळ मिळेल, धान्य मिळेल असे तुकोबा म्हणतात.

तुकोबांनी श्रमसंस्कृतीचा हा मंत्र अभंगगाथेच्या माध्यमातून, कृषीसंस्कृतीतल्या रूपकाच्या माध्यमातून आविष्कृत केला आहे. कारण तुकोबा हे स्वतः कुणबी म्हणजेच शेतकरी होते. अनुभवावाचून कवित्व संपादन करणे तुकोबा पाप मानतात. तुकोबांचे कवित्वात अनुभवाचा कसदारपणा उतरला असून कृषीजीवनाशी त्यांनी उत्तमपणे सांगड घातली आहे. ''महात्मा फुल्यांनी ज्याप्रमाणे 'शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेला साधू' या शब्दात संत तुकारामांचा निर्देश करून तुकारामांचे शेतकऱ्यांच्या जीवनाशी असलेले नाते स्पष्ट केले आहे. त्याप्रमाणे स्वतः तुकारामांनीही आपण कुणबी म्हणजेच शेतकरी असल्याचा आवर्जून उल्लेख केला आहे. 'बरा देवा कुणबी केलो ।नाही तरी दंभाचे असतो मेलो' ।। हे वचन तर त्यांचे विख्यात आहे. 'तुका विनवी कुणा बियाचा नेणं शास्त्रात ।एक पंढरीनाथ विसंबेना ।।' आणि 'तुका विनवी कुणबियाचा' ३७५२ यासारख्या वचनातून त्यांनी आपल्या शेतकरी असण्याचा खास उल्लेख केला आहे.'' तुकोबांना 'शेतकरी असण्याचा अभिमान आहे तो ते व्यक्त करतात. तत्कालीन कालखंडात शेती हे प्रतिष्ठेचे आणि जनजीवनाचे महत्वाचे अंग मानले जात असे. त्या बाबतीत इतर बाबी मात्र त्या तुलनेत कनिष्ठ मानण्याची प्रथा होती. शेती हे जीवनाचे मूलभूत अंग असल्याने त्याचा व्यापक परिणाम किंवा आलेख जनमानसावर होतो आणि म्हणूनच तुकोबांनी कृषीसंस्कृतीशी निगडीत रूपके कवित्वात भिनल्याने ती लोकप्रिय झाली ते म्हणतात –

सेत करा रे फुकाचे ।नाम विठोबारायाचे ।। १।। ।।धृ ।।
नाही वेठी जेवा सारा ।जाहाती नाही म्हणियारा ।।छ।।
सरीक नाही रे दुसरा ।धनी सारा तुझा तू ।।२।।
जतपत नांगरणी ।न लगे आटी दुनवणी ।।३।।
कर्म कुळवणी ।न लगे धर्मपाळी दोन्ही ।। ४।।
ज्ञानपाभारी ती फणी ।न लगे करावी पेरणी ।।५।।
बीज न लगे संचिताचे ।पीक पिकले ठायीचें ।।६ ।।
नाही यमाचे चोरटे ।विठ्ठल पागोऱ्याच्या नेटे ।।७।।
पीक न वजे ही भरवसा ।करी उद्वेग तो पिसा ।।८।।
सराई सर्व काळ ।वांयां न वजे घटिकापळ ।।९।।
प्रेम पिकले अपार ।नाही साटवावया थार ।।१०।।
ऐसिये जोडी जो चुकला ।तुका म्हणे धिग त्याला ।।११।।
११४७ तु.शा.गा.

नामभक्ती म्हणजे तुकोबांच्या कवित्वाचा अत्यंत महत्त्वाचा आविष्कार आहे. भक्तीयोगातून कवित्वाचे स्फुरण तुकोबांना झाले. अंतःकरणाच्या शुध्दीसाठी विठ्ठलाची नामभक्ती असल्याचा विचार त्यांनी व्यक्त केला आहे. ज्याप्रमाणे शेती जर करायची असेल त्याची मशागत करावी लागते, नांगरणी, पेरणी, फवारणी सिंचनाच्या सोई, मळणी या विविध प्रक्रिया जेव्हा शेतकरी करतो त्यावेळी त्याचे फलीत म्हणजे शेतकऱ्यांच्या घरात पीक येते. आणि त्याच्या घरी समृध्दता, आनंद पसरतो तसेच भक्त जेव्हा मनःपूर्वक भक्ती करतो, त्यासाठी त्याची आर्तता आणि तळमळ यामुळे तो नामभक्तीचा आविष्काराने तो सुखाचा परमावधी आनंद प्राप्त होतो ही आनंदाची अनुभूती मात्र चिरंजीवी स्वरूपाची असते. तुकोबांचया भक्तीयोगातील सामर्थ्य हे कर्मयोगाचा संस्काराच्या प्रभावामुळे प्राप्त झाले. तुकोबांचे विठोबाशी असलेले एकरूपत्व आणि निसर्गाच्या सान्निध्यात भंडाऱ्या–भामनाथ डोंगरावर तुकोबांना झालेला साक्षात्कार हा आध्यात्मिक स्वरूपाचा असल्याची धारण ही वारकरी पंथांची भ्क्ताची आहे असे मानले जाते पण याचे विश्लेषण केल्यास तुकोबांचा हा साक्षात्कार अंतर्मनाचा आणि निसर्गाचा होता. तुकोबांना निसर्गातून विश्वाचे दर्शन झाल्याचा प्रत्यय येतो म्हणनूच त्यांच्या कवित्वात अभंगगाथेत वृक्षवल्ली, प्राणी, फुले ही माझी सोयरी असल्याचा तो भाव व्यक्त करतात.

वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे। पक्षीही सुस्वरे आळविती।।१।। ।।धृ।।
येणे सुखे रूचे एकांताचा वास। नाही गुण दोष अंगा येत।।छ।।
आकाश मंडप पृथ्वी आसन। रमे तेथे मन क्रीडा करी।।२।।
कथाकुमंडलू, देहउपचारा। जाणवितो वारा अवसरू।।३।।

हरीकथा भोजना परवडी विस्तार । करोनी प्रकार सेवूंरूची ।।४।।
तुका म्हणे होय मनासी संवाद । आपुलकाचि वाद आपणासी ।।५।।
२४८१ तु.शा.गा.

तुकोबांना सांसारिक जीवनाचा कटू अनुभवानंतर 'वृक्षवल्लींच्या सहवासात तुकोबांच्या मनस्वी विचारांची क्रीडा सुरू झाली यातून विठोबाचे आर्तचिंतन केले. वरती आकाश व खाली पृथ्वी, ज्ञानेश्वरी एकनाथी भागवताचे स्मरण या सर्व निसर्गसहवासातून तुकोबांचा मनाशी संवाद झाला आणि त्यांना अंतःसामर्थ्याचा आविष्कार झाला. एकांतवासात चित्ताची शुध्दता वाढते. अनेक प्रकारचे दोष व्यक्तीमध्ये असतात पण त्याचे आकलन त्याला कधीच होत नाही. कारण तो आत्मपरिक्षण कधी करत नाही. त्याचा दिवसाचा नित्यक्रम हा नेहमी धावपळीचा आणि संसाराची आसक्ती घेऊन निर्माण होतो. यातून त्यांचे चिंतन हे होऊ शकत नाहीत. निसर्ग, शेती यात त्याचे मन रमते म्हणजे त्याला 'स्व' ची जाणीव होते आणि गुणदोषांची जाणीवही त्याला होते. आज 'पर्यावरणाच्या सहवासात, माणसे फारशी एकरूप होत नाही. उलट पर्यावरणाचा धोका म्हणजे सर्वात मनुष्य हाच झाला आहे. पर्यावरणाचा, शेतीचा ऱ्हास आज झपाटयाने होत असल्याने त्यामुळे प्राणी, वृक्ष, जीवन तर धोक्यात आलेच आहे. पण त्यामुळे मनुष्याच्या जीवनाला सुध्दा धोका प्राप्त झाला आहे. कार्बनवायूचे प्रमाणे वाढले असून ऑक्सिजनचे प्रमाण अत्यल्प झाले आहे. ओझोन थर हा कमी झाल्याने पृथ्वीवर उष्णतेचे प्रमाण वाढल्याने अनेक प्रकारच्या समस्या वाढल्या आहेत. हे लक्षात घेता तुकोबांच्या पर्यावरण तथा कृषीसंस्कृतीशी नाळ जुळलेल्या अभंगाचे नव्या पध्दतीने विश्लेषण होणे ही काळाची गरज आहे. निसर्ग हा मानवाचा मित्र आहे. निसर्ग हा सतत मानवजातीला काहींना काही देतच राहतो अशा वेळी मानवाने त्याचे संवर्धन हे केलेच पाहिजे.

सिंचन करीता मूळ । वृक्ष ओलावे सकळ ।।१।। ।।धृ।।
नको पृथकाचे भरी । पडो एक मूळ धरी ।।छ।।
पाणचोऱ्यांचे दार ।। वरील दाटावे ते थोर ।।२।।
वश जाला राजा । मग आपुल्या त्या प्रजा ।।३।।
एक चिंतामणी । फिटे सर्व सुखधणी ।।४।।
२०२८ तु.शा.गा.

वृक्षांचे संवर्धन करण्यासाठी ज्या प्रमाणे वृक्षाला पाणी देण्याची गरज असते पण ते पाणी देण्याची प्रक्रिया सुध्दा चांगली आणि योग्य असेल तरच ते जगेल नाहीतर झाडाला वरवर पाणी दिले आणि त्याच्या मुळांना जर पोहचले नाही तर ते झाड विकसित कसे होईल? त्याच प्रमाणे तुकोबा भक्तीचे सूत्र अभंगवाणीतून मांडतात. ज्याप्रमाणे राजा जर वश झाला तर प्रजा सुध्दा वश होऊ शकते त्याप्रमाणे भक्ती ही एकल देवत्वाची करावी असे भक्तीचे सूत्र तुकोबांनी मांडले. तुकोबांच्या प्रतिमा, प्रतीके ही कृषी संस्कृतीशी निगडत असल्याने त्याचा परिणाम जनमानसावर चटकन होतो.

बीज पेरे पेरी सेती । मग गाडेवरी वाहाती ।।१।। ।।धृ।।
वाया गेले ऐसे दिसे । लाभ त्याचे अंगी वसे ।।छ।।
पाल्याची जतन । तरी प्रत्यया येती कण ।।२।।
२०८६ तु.शा.गा.

शेतात बी पेरतांना शेतकऱ्याला वाटते की 'बी' वाया जाते की काय? पण त्याला अंकुर फुटल्यावर त्याला अगणित आनंद होतो. त्या अंकुराचे झाडात जेव्हा रूपांतर होते तेव्हा त्याला फळे, कणीसे येतात पण त्यासाठी त्या पिकाचे, वृक्षाचे संवर्धन करण्यासाठी त्याची मशागत करून आळे करून पाणी देणे गरजेचे असते तरच गाडीभर धान्य होईल असे तुकोबा म्हणतात. शेतीतून भरघोस पीक जर शेतकऱ्याला हवे असेल तर जलसिंचनाची सोय सर्वप्रथम असणे अत्यावश्यक आहे. पण त्याचबरोबर त्या पिकांन, वृक्षांना त्यांच्या मुळापर्यंत पाणी पोहोचावे तर त्यांचा विकास होईल. असे विकासाचे सूत्र आहे तसेच मानवी जीवन सुखी व समृध्द करायचे असेल तर खऱ्या अर्थाने सुसंस्काराची गरज असते. तरच त्यातून भावी पिढीही सक्षम होण्याची शक्यता असते. मानवीजीवाला उपदेश करतांना सक्षम होण्याची शक्यता असतेत्र मानवीजीवाला उपदेश करतांना, जीवन विषयक विविध दृष्टिकोन व्यक्त करतांना तुकोबा पर्यावरण निसर्गाच्या प्रतीकांचा आधार घेतात. तुकोबा दुष्टपणा न सोडणाऱ्या दुष्टाचे प्रतीक म्हणून निंबाच्या झाडाचे वर्णन करतात –

निंबाचिया झाडा साकरेचे आळे । आपली ती फळे न संडी च ।।१।। ।।धृ।।
तैसे अधमाचे अमंगळ चित्त । वमन ते हित करूनी सोडी ।।छ।।
परिसाचे अंगी लाविले खापर । पालट अंतर नेघे त्याचे ।।२।।
तुका म्हणे वेळू चंदना संगती । काय ते नसती जवळिके ।।३।। ३४०० तु.शा.गा.

कडू निंबाच्या झाडाला साखरेचे आळे करून त्याचे सिंचन जरी केले तरी त्याला फळे मात्र गोड येऊ शकत नाही, तसेच खापराच्या वस्तूला परीसाचा स्पर्श जरी केला तरी ते सुवर्णाचे होऊ शकत नाही. तसेच अधमाचे म्हणजे खलप्रवृत्ती असणाऱ्या

व्यक्तींच्या चितात बदल होऊ शकत नाही. समाजातील दुष्ट प्रवृत्तीला जर आपण प्रमाने संपविण्याचा प्रयत्न केला तरी प्रवृत्ती नष्ट होऊ शकत नाही. त्यासाठी 'अधमासी तो अधम' या न्यायाने व्यवहार करण्यासाठी तुकोबा आसुरी प्रवृत्तीच्या दुर्गुणांचा कडूपणा, विषारीपणा कसा आहे याचे प्रभावी चिंतन निंबाच्या झाडाच्या कडूपणाचे उदा. देऊन करतात.

आसूरी प्रवृत्तीची व्यक्ती ही आपले दुर्गण सोडू शकत नाही तो त्याचा प्रयोग समाजमानसावर करेलच. तुकोबा या दुर्गणाचे वर्णन करतांना बाभळीच्या झाडाचे वर्णन दुर्गुणाचे प्रतीक म्हणून करतात ते म्हणतात –

अभक्ताचे गावी साधू म्हणजे काय? व्याघ्रवाडा गाय सापडली ।।१।। ।।धृ ।।
कसाबाचे आळी मांडिले प्रमाण । वस्वण्णाची आण तया काई ।।छ ।।
केळी आणि बोरी वसती सेजारी । संवाद कोणे परी घडा तेथे ।।२ ।।
तुका म्हणे खीर केली कान्हेळयाची । शुध्द गोडी कैची वसे तेथे ।।३ ।।
३५८५ तु.शा.गा.

अभक्ताच्या गावात साधुची केविलवाणी अवस्था होते कारण साधू-सज्जन व्यक्तीला तेथे विरोध-संकटे सहन करावी लागतात. ज्याप्रमाणे केळी आणि बोरीचे झाड जर जवळ-जवळ असेल तर त्यात गोडवा कसा येईल? हा प्रश्न तुकोबा करतात. केळीने कितीही हळुवारपणा दाखवला तरी बोरीच्या झाडाला काटेरीपणा असतो आणि ते ओरबडल्या शिवाय राहत नाही त्याचप्रमाणे दुर्जन प्रवृत्तीही सज्जनतेला मानसिक शारीरिक त्रास दिल्याशिवाय राहत नाही कारण दुर्जन लोकांची लोकांची ती मुळातच प्रवृत्ती असते. ती नष्ट होऊ शकत नाही. आज समाजात दुर्जनप्रवृत्तीचे प्रमाण वाढणे ही चिंतेची बाब आहे. ज्याप्रमाणे शेतात पीकांमध्ये तणाचे प्रमाण वाढले तर ते मूळ पिकांची नासाडी करून टाकते. त्यासाठी शेतकऱ्यांना तण नाहीसे करावे लागते तसेच समाजात दुर्जनांचा विनाश, त्यांचा प्रतिबंध घालणेही काळाजी गरज आहे. तुकोबा हे साधे, संसारी कुणबी पुरूष असल्याने त्यांनी 'वेदांचा तो अर्थ आम्हासीच ठावा' असा कठोर बाणा घेऊन प्रस्थापितावर त्यांनी अभंगगाथेतून शाब्दिक हल्ला केला आणि प्रस्थापित व्यवस्थेचे पित्त खवळले. यामुळे तुकोबांना समाजातील बाभळीच्या काटेरी खलप्रवृत्तीचा प्रचंड विरोध सहन करावा लागला हे तेवढेच विदारक सत्य आहे. तुकोबांनी 'अनुभव संपन्न कवितेला' प्रमाण मानून जनजीवनातल्या विशेषतः कृषीजीवनाशी निगडीत उपमा-रूपकाची उपयोगीता कवित्वातून मांडली. अनुभवशुन्य तत्वज्ञानाला त्यांनी स्वीकारले नाही. तुकोबा म्हणतात ''शब्दज्ञानी पोटासाठी ज्ञान विकतो. अपरोक्ष अनुभूती प्राप्त असल्याचा वांझोटा प्रयत्न करतो. आत्मज्ञानाचा लवलेश नसतानाही अंगी 'ज्ञानपणाची मस्ती' चढलेली असते. अंगावर संपूर्ण कोड फुटलेल्या माणसाचे गोरेपण जसे किळसवाणे असते तसे अहंकारयुक्त शाब्दिक लोकांचे परोक्षज्ञान जवळ जाताच अहंकाराचा असह्य दर्प असलेला आहे याचा प्रत्यय येतो. ४२ तुकोबांच्या भाषेतच 'शुष्क चावटी' अनुभवावाचून ज्ञान संपादणे त्यांनी स्वहिताचे, राष्ट्रहिताचे नाही असे मानले आहे. 'झाडेझुडी जीवे सोईरे पाषाण' या प्रतिमांची उपयोगिता करीत ते म्हणतात.

अनुभवावाचून सोंग संपादणे । नव्हे ऐ करणे स्वहिताचे ।।१।। ।।धृ ।।
तैसा नको भुलो बाहिरल्या रंगे । हित तेचि वेगें करूनी घेई ।।छ ।।
बहुरूपी रूपे नटला नारायण । सोंग संपादन जैसा तैसा ।।२ ।।
पाषाणाचे नाव ठेवियेले देव । आणिका तारी भाव परि तो तैसा ।।३ ।।
कनक झाड म्हणू वंदियेले माथां । परि ते अर्थान मिळे माजी ।।४ ।।
तुका म्हणे त्याचा भाव तारी त्यास । अहंभावी नाम तोचि पावे ।।५ ।।
३३५८ तु.शा.गा.

तुकोबांच्या बाह्यांग ज्ञानाला, सोगांला सक्तीचा ते विरोध करतात. वरच्या रंगास म्हणजेच अनुभव संपादन करता 'पोपटपंची ज्ञानाला' प्रमाण मानू नये. बहुरूपी ज्या प्रमाणे विविध प्रकारचे वेश धारण करतो पण ते केवळ सोंग असते, तसेच आपटयाचे झाडाला 'दसऱ्याच्या' दिवशी सोन्याचा भाव होतो म्हणून काय त्याला दागिने तयार करण्यासाठी उपयोगात आणतात काय? पाषाण हा पाषाणच आहे. पण त्याला मनुष्य देव मानतो कारण शेवटी भावना महत्त्वाची आहे. अंतरंग जर शुध्द नसेल, वास्तवाची जाण नसेल तर फक्त अहंभाव बाळगण्यात अर्थ तरी काय? माणसं फक्त अहंकाराचा दर्प जोपासण्यात मश्गूल आहेत. पण अंतरंगातील ज्ञानाचे संवर्धन ते करीत नाही. सात्विक आणि विनम्रभावाला जर प्रत्येक मनुष्याने स्विकारले तर समाजात प्रेम-जिव्हाळयाचे वातावरण तयार होऊ शकेल. बोरी-बाभळीचे संवर्धन करण्यापेक्षा केळीसारखे मऊ पिकांचे म्हणजेच सद्गुणांना समाजाने स्वीकारावे. ज्ञानेश्वरीच्या १६ व्या अध्यायात ज्ञानदेवांनी दैवी आणि आसुरी प्रवृत्तींच्या गुणांचे वर्णन केले आहे. याचाच विस्तार तुकोबांनी लोकजीवन-लोकसंस्कृती कृषीसंस्कृतीतील प्रतिमांचे उपयोजन करून सामान्यवर्गाला उपदेशाचे आकलन होईल या भाषेत मांडले आहे. म्हणूनच तुकोबांची अभंगवाणी संपूर्ण महाराष्ट्रात दुमदुमली नव्हे अनेक युगे ती समाजमनावर अधिराज्य करीत आहे. तुकोबांनी समाजातील 'आसुरी प्रवृत्तीवर' हल्लाबोल केला ते म्हणतात.

पापाची संचिते देहासी दंडणा । तुज नारायणा बोल नाही ।।१।। ।।धृ ।।
पेरी कडू जिरे मागे अमृतफळे । अर्का वृक्षा केळे कैसीयेती ।।छ ।।
सुख अथवा दुःख भोग हा देहाचा । नास हा ज्ञानाचा न करावा ।।२ ।।

तुका म्हणे आता देवा का रूसावे । मनासी पुसावे काय केले ।।३।। ४०५५ तु.शा.गा.

मनुष्य जे विहित कर्म करतो ते चांगले वाईट यावर त्याच्या जीवनाची दिशा निश्चित होत असते. त्याने जर दैवी गुणांना आत्मसात करून कर्तव्यकर्मे करीत असेल तर त्याचे कल्याण झाल्याशिवाय राहणार नाही आणि जर दुष्कृत्ये तो करीत असेल तर त्याचे जीवन दुःखी होते. खरे तर माणसाच्या सुखी-दुखी जीवनासाठी तो स्वतःच जबाबदार असतो. पण आपण मात्र 'देववादाला' जबाबदार मानतो. आपण जर भांग पेरली तर तुळस उगवणार आहे काय? कडू जिरे पेरले तर त्याला अमृत फळ उगवेल? अशी आशा करण्यात अर्थ तरी काय? असा सवाल तुकोबा करतात. म्हणून मानवी आयुष्यात नीती संस्कारतेवर भर तुकोबा देतात. कारण याशिवाय भावी पिढी ही चारित्रसंपन्न निर्माण होउ शकत नाही. ज्याप्रमाणे एखादे बीज शेतकरी पेरतो तेव्हा ते शुध्द, सकस असावे लागते. जर ते कर्दळ लागलेले किंवा नासके असेल तर उगविण्याची क्षमता त्यात नसते जर कदाचित ते उगवलेही तर त्याला बीज, फळ हे नासलेले असते तसेच आपल्या भावी पिढीचेही असेच आहे. तुकोबा हा भावार्थ पुढील अभंगात मांडतात.

शुध्द बीजापोटी । फळे रसाळ गोमटी ।।१।। धृ।।<br>
मुखे अमृताची वाणी । देह वेचावा कारणी ।। छ।।<br>
सर्वांगी निर्मळ । चित्त जैसे गंगाजळ ।।२।।<br>
तुका म्हणे जाती । ताव दर्शन विश्रांती ।।३।।

चांगल्या बीजाची फळेही चांगलीच असतात? ती बाहेरुन जशी चांगली असतात तशीच आतूनही कसदार असते? अशा रीतीने ती संतुलित असतात? त्यांचे अंतरंग आणि बहिरंग यांच्यात एक प्रकारचे संतुलन असते. एक आल्हाददायक सुसंगती असते. जो जाणता शेतकरी असतो, तो चांगल्या बीजाची उत्तम रीतीने करतो. निवड करताना तो चांगले बी पेरणीसाठी बाजूला काढून ठेवतो आणि जे खोटे असेल सदोष असेल ते दूर ढकलून देतो.'' सद्गुण आणि दुर्गुणाची निवड प्रत्येक व्यक्तीने शेतक-याप्रमाणे केली पाहिजे तरच मानवीजीवन सुखी होउ शकते? दुर्गुणांना थारा न देतात संस्काराने, सद्गुण भावी पिढीवर व्हावेत तरच त्याला गोमटी, रसाळ फळे आल्याशिवाय राहणार नाही. वर्तमानात या विचारांची समाजाला अत्यंत आवश्यकता आहे. विविध वाहिन्यांवरुन आज जे अनीतीचे कुसंस्कार होत असल्याने युवा पिढीवर घातक परिणाम होत आहेत. ज्या वयात निर्मळ मनावर बोधप्रद संस्कार व्हावेत त्या वयात हिंसा करणारे, बीभत्स असे कुसंस्कार होत आहेत. चारित्राऐवजी चारित्रहीनतेला प्रतिष्ठा देण्याचे अघोरी वातावरण समाजात आहे. वातावरण कायम राहिल्याने येणारी पिढी ही समाजाला घातक ठरु शकते. या पार्श्वभूमीवर तुकोबांचे हे बोधप्रद विचारांची समाजाला गरज आहे.

शुध्द बीजाची शेतक-याने पेरणी केल्यावर त्याला सिंचनाची कशाप्रकारे गरज असते हे तुकोबा पुढील अभंगातून पटवून देतात.

नाही निर्मळ जीवन । काय करील साबण ।। १।। ।।धृ।।<br>
जैसी चित्तशुध्दी नाही तेथे बोध करीत काई।। छ।।<br>
वृक्ष न धरी पुष्पफळ काय करील वसंतकाळ ।।२।।<br>
वांजे न होती लेकरे काय करावे भ्रतारे ।।३।।<br>
नपुंसका पुरुषासी काय करीत बाइल त्यासी ।। ४।।<br>
प्राण गेलिया शरीर काय करीत वेव्हार ।। ५।।<br>
तुका म्हणे जीवनेविण पीक नव्हे नव्हे जाण ।। ६।।

पाणी जर निर्मळ नसेल तर, साबणाचा उपयोग नाही. त्याचप्रमाणे वय निघून गेल्यावर शरीरात कोणताही व्यवहार शक्य नाही. पिकांचे तसेच आहे. पाणी जर नसेल तर पीक येवू शकणार नाही. कारण पिकांचे जीवन पाणी हेच आहे. तसेच मानवी जीवन सुध्दा पाण्याशिवाय जगू शकत नाही. 'पाणी हेच जीवन आहे' हे खरे सत्य आहे. शेतीसाठी मुबलक पाण्याच्या आवश्कतेवर तुकोबा भर देतात. आजही जलसिंचनातून शेती सदैव भरभराटीची राहिली आहे. शासनस्तरावर नदीनाले यावर वनराई, मातीचे, सिमेंटचे बंधारे बांधून, त्याचे कालव्यातून शेतीला पाणी पुरविले जाते. यातूनच शेती समृध्द होते. पण या समृध्दतेसाठी तुकोबांनी श्रमसंस्काराचा मूलमंत्र सांगितला आहे. शेतीसाठी ख-या अर्थाने श्रमाची गरज असते. परिश्रम-करण्याशिवाय शेती फूलू शकत नाही. अनेक प्रकारच्या संकटाना तोंड देत शेतक-यांना परिश्रम करावे लागतात. जर परिश्रमात उणीव राहिली तर शेती विकसित होउ शकत नाही. कोरडवाहू शेतीतले अनेक प्रश्न आज निर्माण झाले आहेत. रासायनिक शेतीमुळे शेतीचा कसदारपणा कमी होत आहे. खते, बियाणे याचा काळाबाजार होत असल्याने तसेच जाचक सरकारी धोरणामुळे शेतकरी नागविल्या जात असल्याने, विदर्भात तसेच संपूर्ण देशात शेतक-यांच्या आत्महत्या होत आहेत. पंतप्रधान पॅकेज केंद्र शासनाने जाहीर केले त्यातून शेतक-यांना भाकड गाई, भ्रष्टाचाराचे कुरण असणा-या योजना, नादुरुस्त मशीनी या शेतक-यांना दिल्या जातात. शेतक-यांच्या आत्महत्या ही आज प्रगत समाजाची भयानक शोकांतिका होउ पाहत आहे. या पार्श्वभूमीवर सरकारी, सामाजिक स्तरावर शेतक-यांच्या आत्महत्या याला प्रतिबंध घालण्यासाठी प्रयत्नाची पराकाष्ठा होणे गरजेचे आहे. केवळ कारणांची यादी करण्यापेक्षा 'असाध्य ते साध्य करिता सायास । कारण अभ्यास तुका म्हणे । ही विचारधारा जनमानसात रुजविणे काळाची गरज आहे.

ओले मूळ भेदी खडकाचे अंगी । अभ्यासाशी सांग कार्यासिध्दी ।। १।। ।।धृ।।
नव्हे ऐसे काही नाही अवघड । नाही कईवाड तोंच वरि ।। छ।।
दोरे चिरा कापे पडिला काचणी २ अभ्यासे सेवनी विष पडे ।। २।।
तुंका म्हणे कैंचा बैसण्याची ठाव २ जठरी बाळा वाव एकाएकी ।। ३।।

प्रयत्नांची पराकाष्ठा केल्यास कोणतेही इप्सित कार्य तडीस जावू शकते. एवढेच काय दगडाला सुध्दा छिद्र पाडण्याचे सामर्थ्य दो-यात आहे हा तुकोबांचा आत्मविश्वास शेतक-यांना 'आत्महत्या' पासून परावृत्त करण्याची प्रेरणा देउ शकतो. कारण शेतकरी रंजलेला-गांजलेला झाल्याने तो हतबल झाला. त्यामुळे त्याच्याकडे 'आत्महत्या' हा एकच पर्याय दिसत असल्याने आत्महत्येचा दुर्दैवाने तो स्वीकार करीत आहे. तुकोबांच्या अभंगाचे पठण-विश्लेषण विशेषतः कृषीजीवनाशी निगडीत असलेल्या विचारांना प्रसारीत करावे तर शेतकरी यातून प्रेरणा घेउ शकेल. आणि त्याला प्रगतीचा मार्ग दिसेल असे मनस्वीपणे वाटते. तुकोबांनी प्रपंचाला सुखी कसे करावे हा मंत्र त्यांनी कृषिसंबधित रुपकांतून अप्रतिमपणे मांडला आहे तुकोबा म्हणतात.

संत आले सुगी सांभाळावे चारी कोन
पिक आले परी केले पाहिजे जतन
सोकरी सोकरी सोहंकरी
विसावा तोंवरी नको उभे आहे तो
गोफळीस गुंडा घाली पागो-याच्या नेटे
पळती हाहाकारे अवघी पाखराची थाटे
पेटवूनी धागटी राहें जता पालटूनी
पडालिया मानी बळ बुध्दी व्हावी दोनी
खळे दाणे दाते विश्व सुखी करी होता रासी
सरा सारुनिया ज्याचे भाग देईत्यासी
तुका म्हणे मग नाही आपुले कारण
निज आले हातां भूस सांडिलेनी कण

पीक शेतात उभे आहे तोपर्यंत त्याचे रक्षण करणे गरजेचे असते. गोफणीत दगड घालून ते भिरकावले तर शेतातील पिकाचे पक्षांपासून रक्षण होवू शकेल. जीवनात क्रोध, लोभ, वासना या दुर्गुणांना थारा देउ नको. मनातील कुविचारांचा भुसा दूर काढून टाका, संसारात आसक्ती ठेवू नका नाही तर त्यात तुम्ही बुडून गेला तर कल्याणाचा मार्ग कसा काय दिसू शकेल. मानवी आयुष्यात विठोबाची कृपा, मोक्ष जर तुम्हाला हवा असेल तर जीवनात विहित कर्म कर्तव्यबुध्दीने पार पाडा. कारण मानवी जीवनाची परिणिती ही विदारक स्वरुपाची आहे. माणसाच्या शेवटच्या क्षणी मृत्यूपंथाला जाताना त्याचा प्रवास हा एकटयाचा असतो. ज्या भौतिक गोष्टीत तो आसक्तीने बुडालेला असतो, त्यापैकी काहीही सोबत येत नाही. हे वास्तव आहे. तुकोबा म्हणतात-'धन मेळवूनी कोटी सवे न ये रे लंगोटी गुरे गोठयात, पैसा बॅंकेत, बायको दारात आणि त्याला निरोप दयायला मित्र स्मशानात जाईल. अशा या पार्श्वभूमीवर तुकोबांनी नीती आणि सदाचार युक्त कर्मयोग प्राप्त करा शेवटचा प्रवास करतांना त्याचे बरोबर कोणी येत नाही यासाठी ते कृषीरुपके, पीक, गोफळा, खळे, दाणे, भुसा याची योजकता अभंगातून करतात.

तुकोबांनी विशिष्ट वृक्षांची व पिकांची गुणधर्म अत्यंत रुपकात्मक पध्दतीने मांडली आहे ते म्हणतात.
कठीण नारळाचे अंग । बाहेरी भीतरीचे चांग ।। १।। ।।धृ।।
तैसा करी का विचार शुध्द कारण अंतर ।। छ।।
वरी काटे फणसफळा माजी अंतरी जिव्हाळा ।। २।।
मिठे रुचविले अन नये सतत कारण ।। ३।।
उस बाहेरी दिसे काळ आत रसाचा आगळा ।। ४।।
तुका म्हणे मोल गोडी काय चाड वरिल्या खोडी ।। ५।।

नारळ हे बाहेरुन टणक, कडक असते पण आतून मात्र गर त्याचा गोड असतो. तसेच फणसाचेही आहे. मीठाचा योग्य उपयोग हा अन्नाला रुचकर करतो. पण वारंवार त्याचा वापर केला तर चव बिघडते. म्हणजे खरा अर्थ हा गोडीचा आहे. मानवी जीवन सुखी व समृध्द जर करायचे असेल तर, प्रत्येक गोष्टीतील गोडी ओळखता आली पाहिजे तर जीवन सुखी होईल. तुकोबांच्या रुपक-प्रतिमा समाजमानसावर सहज परिणम करतात. त्याचा अर्थबोध होण्यास विलंब होत नाही. म्हणूनच तुकोबांची भाषा, प्रतिमा या लोकजीवनातील असल्याने त्यात सुबोधता आली आहे. शेतक-यांच्या आयुष्यात अनेक प्रकारचे खाचखळगे असतात. त्यावर मात करीत त्याला मार्ग काढावा लागतो. हा भाव अभिव्यक्त करताना तुकोबा म्हणतात-

'आले फळ तेव्हा राहिले पिकान जरी हे जतन होय देठी
नामे चि सिध्दी नामें चि सिध्दि व्यभिचार बुध्दि न पवता

चलिता पंथ तो पाववी ठाया जरि आड तया नये काही
तुका म्हणे मध्ये पडती आघात तेणे होय घात हानि लाभ

ज्याप्रमाणे कळीचा देठ जर पक्का-मजबूत नसेल तर, ते न पिकता गळून पडते ते गळू नये म्हणून फळाचे नीट जतन करावे लागते. त्याला अनेक संकटापासून वाचवावे लागते. तरच रसाळ फळाची निर्मिती होउ शकते. तसेच मानवी आयुष्याचे आहे. जीवन जर सुसंस्कारित नसेल अनेक दुर्गुणांनी युक्त असेल तर जीवनाचा डाव अर्ध्यावरती डाव संपतो. तसेच अनेक संकटात जर त्याचा आत्मविश्वास कमकुवत झाला तर, जीवनाचा शेवट होतो कारण ''मनुष्य ज्या मार्गाने जात असतो, त्या मार्गावर काही आडवे आले नाही तरच तो मार्ग त्याला इष्ट स्थळी पोचवू शकतो. परंतु प्रत्यक्ष जीवनाचा प्रवास असा निर्वेध नसतो, मध्येच आघात होतात. परिस्थितीचे चटके बसतात. त्यामुळे घात होउ  शकतो. कधी हानी होते आणि अधूनमधून लाभही होतो. मधे-मधेच हे जे आघात होतात, अडथळे येतात, त्यापासून स्वतःचे रक्षण करण्याची व्यवस्था करणे आवश्यक असते. शेतक-यांच्या अनुभव विश्वातून आपल्याला हा एक लाख मोलाचा सल्ला मिळतो. हा तुकोबांचा लाखमोलाचा सल्ला आज शेतक-यांसाठी जीवनदायी ठरला आहे कारण निसर्गाचे अस्मानी संकट आणि सरकारी धोरणाचा अभावामुळे शेतकरी हा 'अन्नदाता आहे असे आपण मानतो पण त्याच्यावर आज आत्महत्या करण्याची दुर्दैवी वेळ आली. शेतक-यांनी आत्महत्या करु नये यासाठी शासनामार्फत उपक्रम राबविण्याचे कार्य सुरु आहे. त्यात प्रामुख्याने शेतक-यांना आर्थिक मदत, प्रबोधन, सत्संग हे आहेत. तरीसुध्दा आत्महत्येचे हे लोण थांबत नाही. या पार्श्वभूमीवर विचार करता असे प्रत्ययास येते की, महाराष्ट्रात वारकरी संप्रदायाचे लाखो अनुयायी आहे. या वारकरी शेतक-यांना कीर्तन-प्रवचनांच्या माध्यमातून प्रबोधन व्हावे. तुकोबांच्या कृषीसंस्कृतीशी निगडीत अभंगाचे निरुपण त्यांना ऐकवावे. प्रबोधन केवळ आध्यात्मिक अनुभूतीपुरते न मांडता, राष्ट्रीय-सामाजिक स्वरुपात वारक-यासमोर आल्यास महाराष्ट्रात प्रबोधनाची ही क्रांतिकारक वाट पुढे अव्याहतपणे सुरु राहील. तुकोबांनी अभंगवाणीतून मांडलेला कृषीसंस्कृतीतीचा विचार लोकजीवनाशी निगडीत आहे. त्या प्रतिमांची, रुपकांची विस्तृत माहिती शेतक-यांना मिळावी. नांगर, बीज, औत, फळ, झाड, सोंगले, खळे, पक्षी या सर्व प्रतिमांतून तुकोबांनी जीवनविषयक तत्वज्ञानाची मांडणी केली. जीवनातील साध्या, सरळ गोष्टीतून त्यांनी जनसामान्यांसाठी जीवनाची रेषा कल्याणकारी केली. अनेक संकटावर हळुवार मात कशी करावी याचे तत्वज्ञान मांडले. आणि सर्वात महत्वाचे म्हणजे तुकोबांनी अनुभवातून सत्य पारखल्यामुळे त्यांच्या या अभंगांना कृती आणि उक्तीचा सुगंध आला. तुकोबाची अभंगवाणी. लोकप्रिय होउन शेतकरी-कुणब्यांनी ती मौखिक अर्थाने प्रस्थापितांनी इंद्रायणीच्या डोहात बुडवून सुध्दा ती तरली. शेतकरी, कुणबीयांनी ती मौखीक पाठांतराने तारली असे समर्थपणे म्हणणे संयुक्तिक होईल.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

* International Scientific Journal Consortium
* OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.org